—: प्रेसनोट :— दि. १०/०८/२०२१

**तक्रारदार यांना पुर्नवसन सदनिकेचा ताबा देण्याकरीता यातील आरोपीताने दोन लाख रक्कमेची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १ लाख ५० हजार रुपयाची मागणी करुन स्विकारणार असल्याचे स्पष्ट झाल्याने सापळा कारवाईमध्ये रु. १,५०,०००/— लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोंद.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | गुन्हा रजि.नं. ३४/२०२१ |
| कलम | ७ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | सुनिल दशरथ आटपाडकर वय ४६ वर्षे सहा. समाज विकास अधिकारी (वर्ग—२), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बी.के.सी. बांन्द्रा, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २,००,०००/—रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १,५०,०००/— रुपये |
| थोडक्यात माहिति | यातील तक्रारदार हे कांदिवली (पश्चिम) परिसरात रहावयास आहेत. सन २०१७ मध्ये परेल रेल्वे स्टेशन जवळ झालेल्या चेंगराचेंगरी घटनेमुळे तेथील विस्तार दरम्यान एम.एम.आर.डी.ए. ने परळ रेल्वे स्टेशन जवळील सर्व अनधिकृत घरे निष्कासित करण्यात येवून त्याबदल्यात संबंधीतांना मानखुर्द हिरानंदानी टाटा नगर येथे सदनिका देण्यात आल्या होत्या. निष्कासित करण्यात आलेल्या घरामंध्ये तक्रारदार यांचेही घर होते व त्याबदल्यात त्यांनाही मानखुर्द हिरानंदानी येथे सदनिका देण्यात आली होती. परंतु काही कारणास्तव त्यांनी ती सदनिका ताब्यात घेतली नव्हती. परंतु सध्या तक्रारदार यांना सदर सदनिकेची आवश्यकता असल्याने त्यांनी दि.०२/०८/२०२१ रोजी सदर सदनिका मिळणेबाबतचा अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, सामाजीक विकास अधिकारी, एम.एम.आर.डी.ए. मुंबई यांना केला होता. सदरचा अर्ज आरोपी लोकसेवक यांचेकडे चौकशीकरीता प्रलंबित होता.<br>सदर अर्जाच्या अनुषंगाने दि. ०५/०८/२०२१ रोजी तक्रारदार हे आरोपी लोकसेवक यांना भेटले असता, अर्जावर पुढील कार्यवाही करण्यासाठी आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे रु.२,००,०००/— रक्कमेची मागणी केली.<br>तक्रारदारास आरोपी लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दि. ०६/०८/२०२१ रोजी प्रत्यक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली.<br>दि.०९/०८/२०२१ रोजी तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन पडताळणी केली असता, यातील आरोपी लोकसेवक याने तक्रारदार यांचेकडे मानखुर्द येथील रुमचा ताबा देण्याकरीता रु. २,००,०००/— रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती रु.१,५०,०००/— इतक्या रक्कमेची लाचेची मागणी करुन ती स्विकारणार असल्याचे स्पष्ट झाले.<br>दि. १०/०८/२०२१ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपीत लोकसेवकाने तक्रारदार यांचेकडुन रु. १,५०,०००/— लाचेची रक्कम स्विकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

Addl. Dy. Commissioner of Police, Anti Corruption Bureau, Mumbai Unit

१०/८/२१

( हेमंत सावंत )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००